वर्ष: २
अंक : २१
एप्रिल: २००८

अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

|वस्तीवासियांचं मासिक माहितीपत्र |पुणे आवृत्ती | मूल्य: रुपये २ |

# मनोगत

UpLift
Enriching lives of the poor...together

## मदतनीस

### मुक्ता हेल्पलाईन

२५४६०१०२

एच्. आय्. व्ही.- एडस् विषयी शंका अथवा प्रश्न विचारण्यासाठी

### चाईल्ड लाईन

१०९८

अडचणीत सापडलेल्या मुलांना मदत करण्यासाठी वरील फोनवर संपर्क करा.

### सखी (सुसंवाद संचालित)

२५५३८४३४

### स्त्री-आधार केंद्र - २४३९४१०४ / २४३९४१०३

गरजू व पीडित महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी हेल्पलाईन

### हृदय मित्र प्रतिष्ठान

२४४५६८४९

हृदय शस्त्रक्रियेसाठी मदतीस मार्गदर्शनपर हेलपलाईन:

### मुक्तांगण

२६६९७६०५

व्यसनमुक्ती केंद्र

## संपादकीय...

आकाशला लहानपणापासूनच कारचं भयंकर आकर्षण वाटत असे. आपल्यालाही अशीच कार हवी म्हणून त्याने एकदा आपल्या गरीब वडिलांकडे हट्ट धरला. वडिलांनी त्याला त्याचे शिक्षण संपल्यावर कार घेऊन देऊ असे सांगितले. बघता बघता आकाशचे शिक्षण संपले. आता आपल्याला कार मिळेल या आशेने तो वडिलांजवळ रिझल्ट घेऊन गेला. वडिलांना फार आनंद झाला. त्यांनी आकाशला त्यांच्या वडिलांनी दिलेले गोष्टीचे पुस्तक बक्षीस म्हणून दिले.

वडिलांनी कार न देता एक जुने फाटके पुस्तक दिले याचा आकाशला राग आला. पुस्तक तिथेच टाकून नोकरी निमित्त तो घर सोडून गेला. पुढे त्याला चांगली नोकरी मिळाली. कार घेण्यासाठी किती कष्ट करावे लागतात याची त्याला जाणीव झाली. हळूहळू त्याचा वडिलांवरचा रागही कमी झाला. एक दिवस अचानक तो वडिलांना भेटायला जुन्या घरी गेला. तेव्हा वडिलांचे निधन झाल्याचे त्याला कळले.

जुन्या घरातल्या लहानपणीच्या आठवणींनी त्याचे मन भरुन आले. इतक्यात त्याला वडिलांनी दिलेले ते फाटके पुस्तक दिसले. कुतुहल म्हणून त्याने पुस्तक उचलले. त्याच वेळी पुस्तकातून एक किल्ली खाली पडली. पुस्तकामध्ये ठेवलेली एक चिठ्ठीही त्याला मिळाली. चिठ्ठी वाचल्यावर आकाशला कळले की आपल्या वडिलांनी कष्ट करुन खरंचंच कार विकत घेतली व त्याची किल्ली आपल्याला दिली! एका फाटक्या पुस्तकात इतकी मौल्यवान वस्तू असेल याची त्याला कल्पनाही आली नाही.

बघितलंत मंडळी, आपणही आपल्या बाह्यरुपावर, रंगावर जास्त लक्ष देतो. मोठमोठे बंगले, इमारती, गाड्या यांच्याकडे बघत रहातो. पण मंडळींनो, या बाह्यरुपावर लक्ष न देता जर आपण आपल्या गुणांकडे लक्ष दिले तर अशीच किल्ली तुम्हालाही सापडेल! काय?

मनोगत तुमच्या मदतीला आहेच. पुन्हा भेटूच. रामराम.

## या अंकात काय वाचाल?

▸ हरबा व केरबा - आपल्याकडील मालाची किंमत कशी ठरवाल?.....पान २
▸ आपले आरोग्य आपल्या हाती - हृदयविकार......पान २
▸ कौटुंबिक - आपली मुलगी लग्नाची आहे का?......पान ३
▸ क..क..कायद्याचा - रेशनकार्डावरील आपल्या हक्काचा शिधा......पान ३
▸ योजना - कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबांना प्रोत्साहन देणेबाबत योजना......पान ४
▸ पेराल ते उगवेल - सौ. शोभा विठ्ठल खबाडे यांचे यश......पान ४

याशिवाय संपादकीय, महत्वाचे फोन नंबर आणि काही सूचक आकडेवारी जरूर वाचा.

## आकडेवारी

८

पुणे शहरात महापालिकलेच्या जागेवर अस्तित्वात असलेल्या भाजी मार्केटचा चेहरा मोहरा बदलण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात आठ भाजी मार्केटचे विकसन करण्यात येणार आहे. यात पार्किंगच्या सोयीबरोबरच गाळ्यांची संख्या वाढविण्यात येणार आहे.

सकाळ : २५ जानेवारी २००८

| मार्केटचे नाव | सध्या असलेले गाळे | नियोजित गाळ्यांची संख्या |
|---|---|---|
| चंदननगर-खराडी | ४० | ८४ |
| हडपसर (जवाहरलाल नेहरु) | ६६ | २३० |
| येरवडा (शील राज शाळवे) | १५८ | २०८ |
| कोंढवा | ७२ | ८४ |
| गोखलेनगर | ३१ | ८२ |
| मुंढवा | ४४ | ६० |
| बोपोडी | १७ | ६० |
| रास्ता पेठ | ५८ | १२२ |
| एकूण | ४८६ | ९२० |




## आपल्याकडील मालाची किंमत कशी ठरवाल ?

लेखन: अंजली कुलकर्णी, स्वाभिमान

(हरबा आपल्या दुकानात रेडिओ ऐकत बसलेला आहे. तेवढ्यात केरबा तिथे येतो.)
केरबा : काय हरबा, आज एकदम निवांत दिसतोयस ?
हरबा : आज मी एकदम खूष आहे बघ.
केरबा : का रे बाबा, लॉटरी बिटरी लागली की काय ?
हरबा : तसंच म्हण ना !
केरबा : म्हणजे ?
हरबा : अरे काल महाशिवरात्री होती ना, चांगली २ पोती रताळी खपली बघ !
केरबा : वा ! चांगलाच जोरात धंदा झाला म्हणायचा की.
हरबा : मग. अरे सगळी गर्दी माझ्याकडेच लोटली होती. फराळ करायला सुद्धा वेळ नाही मिळाला मला.
केरबा : कसा भाव लावला काल रताळ्याला ?
हरबा : सगळीकडे १२-१३ नं चालला होता भाव. मी ११ रुपये किलोनं विकली.
केरबा : पण हरबा, मला एक सांग तू मार्केटमधून काय भावाने रताळी आणली ?
हरबा : आता बघ मी १००० रुपयात १०० किलो रताळी आणली होती. म्हणजे १० रु. किलोप्रमाणे पडली ना मला.
केरबा : तू इथपर्यंत माल कसा रे आणलास ?
हरबा : काय सांगू तुला. ती जड पोती काही मला उचलेनात. मग काय हमालाला २० रुपये दिले रिक्षात चढवायला.
केरबा : अन् रिक्षावाल्याला किती पैसे दिले ?
हरबा : दिले असतील ५० रुपये.
केरबा : आता मला सांग. तू रताळी आणली १०० किलो. पण त्यातली काही वाया पण गेली असतील की नाही.
हरबा : ती तर जातातच एक दोन किलो.
केरबा : म्हणजे २० रुपये तुझ्याच खिशातले गेले म्हण ना.
हरबा : पण तू हे सगळं का विचारतोयस ?
केरबा : हे बघ हरबा, काल तू १००० रुपयाची रताळी आणलीस. पण त्यासाठी तू हमाल लावला, रिक्षा केली, काही रताळी वाया गेली. म्हणजे अजून तुला १०० रुपये लागलेच असतील की नाही.
हरबा : असतील की.
केरबा : याचा अर्थ तुझा काल एकूण खर्च ११०० रुपये झाला. म्हणजे तुला काय भावाने पडली रताळी.
हरबा : ११ रुपये किलोने.
केरबा : अन् तू विकली कितीने ?
हरबा : तेवढ्याच भावाने ! बापरे !
केरबा : शिवाय काल तू अन् वहिनी दिवसभर उन्हातान्हात राबलात की नाही ? त्यांचं काय ?
हरबा : म्हणजे मला चांगलाच तोटा झाला की.
केरबा : मग बाकीचे लोक काय उगाच १२-१३ रुपये किलोने विकत होते की काय ?
हरबा : आता मला खरं कळलं बघ. मी भाव ठरवताना हा इतर खर्च विचारातच घेतला नाही !
केरबा : मग लक्षात ठेव विक्री किमतीवर आपल्या व्यवसायाचा फायदा किंवा तोटा अवलंबून असतो. अन् नफ्यावरुन व्यवसायाचं यश अपयश ठरतं. काय ?
हरबा : खरंच केरबा. तुझ्यामुळेच मला मालाची किंमत कशी ठरवायची ते कळलं.
केरबा : चल आता झालं गेलं विसरुन जा. आणि भविष्यात अशी चूक करु नको. निघतो आता मी.
हरबा : तुझ्यारुपानं पंढरपूरचा विठ्ठलच माझ्या भेटीला आला की. धन्यवाद केरबा.

## आपले आरोग्य आपल्या हाती

# हृदयविकार

हृदयविकारास आपली <u>जीवनशैली</u> हे सर्वात महत्वाचे कारण आहे. पुढे दिलेल्या चित्रांमधून काही संदेश दिले आहेत. त्याचे पालन केले तर आपले हृदय निरोगी राहण्यास नक्कीच मदत होईल.

हृदयविकाराचा झटका आल्यामुळे मृत्यू ओढवल्याच्या अनेक घटना आपल्या परिसरात घडल्या असतील. जागतिक आरोग्य संघटनेच्या २००२ च्या अहवालानुसार भारतात हृदयविकारांचे प्रमाण वाढतच चालले आहे. २०२० साली हृदयविकाराने दगावणाऱ्यांची संख्या इतर कोणत्याही आजाराने दगावलेल्यांपेक्षा जास्त असेल. हृदयविकारांमध्येही हृदयाचा झटका येऊन दगावणाऱ्यांची संख्या निम्म्याहून अधिक असेल. ही धोक्याची सूचना आहे.

हृदयविकाराची कारणे जाणण्याआधी आपण हृदयविकाराचा झटका म्हणजे काय हे समजावून घेऊ ;

हृदय हे आपल्या शरीरात पंपाप्रमाणे काम करीत असते. शरीरातील अवयवांकडून आलेले अशुद्ध रक्त शुद्ध करुन ते अवयवांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हृदयामार्फत होत असते. विविध अवयवांना कार्यरत रहाण्यासाठी जशी शुद्ध रक्ताची गरज असते तशीच हृदयालाही असते. आपल्या हृदयातील स्नायूंना शुद्ध रक्ताचा पुरवठा करण्याचे काम करोनरी आर्टरी ही नलिका करीत असते.

हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमुख कारण आहे <u>करोनरी आर्टरी डिसीज</u> अथवा हृदयाला शुद्ध रक्त पुरविणाऱ्या नलिकेमधील दोष. या नलिकेच्या आतील बाजूस ठिकठिकाणी स्निग्ध पदार्थांचे थर जमा होतात. कालांतराने हे पातळ थर जाड होतात व रक्ताच्या वहनास अडथळा निर्माण करतात. हे घडण्यास अनेक वर्ष जरी लागत असली जसजसा स्निग्ध पदार्थांचा थर वाढू लागतो तसतसा नलिकेचा आकार कमी होतो व हृदयास होणारा रक्तपुरवठा कमी होऊ लागतो. एक दिवस नलिकेचा मार्ग पूर्ण बंद होतो व हृदयविकाराचा झटका येतो.




हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी मदत मिळवण्यास हृदय मित्र प्रतिष्ठान तर्फे मार्गदर्शन दिले जाते. त्यासाठी खालील फोनवर संपर्क साधा. २४४५६८४९

ऑक्टोबर महिन्याच्या अंकात जीवनदायी योजनेबद्दल माहिती दिली आहे. शासनाच्या या योजनेअंतर्गत हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जाते. अधिक माहितीसाठी मनोगतचा ऑक्टोबरचा अंक पहा अथवा संस्थेच्या शाखेतील कार्यकर्त्यांकडून माहिती मिळवा.

## कौटुंबिक

### आपली मुलगी लग्नाच्या वयाची आहे का ?

लेखनः नेहा घाणेकर,
स्वाभिमान



विजयाताईंनी बोलाविलेल्या मिटिंगला आज सर्व बायका उपस्थित होत्या. विजयाताईंनी सर्वांकडे हसतमुखाने पाहिले आणि विषयाला सुरुवात केली. आतापर्यंत आपण गर्भात असताना लिंग कसे ठरते, स्त्री-भ्रूण हत्या, मुला-मुलींमध्ये होणारा भेदभाव याविषयांवर चर्चा केली. आज आपण मुलीच्या लग्नाच्या वयाविषयी चर्चा करू.

चर्चेला खरी सुरुवात झाली जेव्हा कमलाताई म्हणाल्या की कायदा काही पण सांगू दे, पण मुलीचं लवकर लग्न झालेलंच बरं. लहान वयातच संसार, मूल सगळं झालं की या सगळ्यातून लवकर मोकळं होता येतं. बहुतेक जणींनी कमलाताईंच्या या बोलण्यावर होकारार्थी मान हलवली. पण विजयाताई म्हणाल्या की, संसार म्हणजे केवळ मूल होणं नाही तर संसारातल्या सगळ्या जबाबदाऱ्या पेलण्याची शारीरिक व मानसिक ताकद येणे. आज आपल्या वस्तीतल्या कितीतरी मुली पटत नाहीत म्हणून माहेरी परत येतात. इथेही वैचारिक परिपक्वता कारणीभूत ठरते. विचारांची परिपक्वता वयाबरोबर अनुभवातून आणि शिक्षणातून येते. पण लहान वयात शिक्षण सोडून लग्नाच्या बेडीत अडकलेल्या या मुलींना मग काहीच मार्ग उरत नाही. काय कांताताई बरोबर आहे ना ?

यावर कांताताई म्हणाल्या की मुली मोठ्या झाल्या की त्यांना फार शिंग फुटतात. मग उलट सासरशी पटवून घ्यायला अवघड जातं. पण विजयाताईंनी कांताताईंना समजावले की किशोरीवयात शरीराच्या वाढीबरोबर मनही विकसित होत असते. त्यामुळे विरोध करणे, स्वतःची मते मांडणे, आवडी-निवडी व्यक्त करणे हे साहजिकच आहे. सासर या नावाखाली आपण मुलीला बोलूच देणार नसू तर मग तिचे व्यक्ती म्हणून असलेले स्वातंत्र्य आपण हिरावून घेतो. नाही का ?

कांताताईंना हा मुद्दा जरी पटला असला तरी मुलीच्या काळजीपोटीच आईवडील लवकर लग्न करतात असे त्यांचे ठाम मत होते. मला तर कामाला जाताना पोरीची रोज काळजी वाटते. हल्ली जमाना फार वाईट आहे. त्यामुळे मुलगी आपल्या सासरी लवकर गेली की काळजी मिटली असं त्या म्हणाल्या. पण मुलींच्या सुरक्षिततेबद्दल बोलायचं झालं तर धोका फक्त तरुण मुलींनाच नाही. जर आकडेवारी पाहिली तर स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारांपैकी विवाहित महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांचं प्रमाण कितीतरी अधिक आहे. अशा समाजकंटकांशी मुकाबला करण्यासाठी मुलींना स्वसंरक्षणाचे धडे द्यायला हवेत. विजयाताईंच्या या मुद्द्यावर मात्र सर्वांनीच सहमती दाखवली.

एव्हाना बायका मनमोकळेपणाने बोलू लागल्या होत्या. आशाताई म्हणाल्या की ताई, मला चार मुली आहेत. मुलगा होईल या आशेने एका पाठोपाठ एक मुलं होऊ दिली. पण आता या सगळ्यांना उजवल्याशिवाय माझ्या जिवाला चैन पडत नाही. त्यामुळे त्यांची लग्न लवकरात लवकर व्हावी असं मला वाटतंय. विजयाताई आशाला धीर देत म्हणाल्या की आईचं मन आपण समजू शकतो. पण आपल्या मुलींना स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे राहण्यासाठी जर आपण आज हात दिला नाही तर पालक म्हणून आपले कर्तव्य कमी पडल्याची बोच आपल्याला राहील हो ना ? आशाला विजयाताईंचे बोलणे पटले.

कमलाताईंनीही त्यांच्याकडे मुलीची पाळी आल्यावर लगेच लग्न झाले पाहिजे असा नियम आहे असे सांगितले. मुलीची पाळी आली म्हणजे मुलगी लग्नास योग्य झाली हा समज बरोबर नाही. मूल जन्माला घालण्यासाठी गर्भाशयाची पुरेशी वाढहोणेही गरजेचे आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मुलीची मानसिक वाढही होणे गरजेचे असते.

कधी न बोलणाऱ्या लीलाबाईंनी सांगितलं की त्यांच्याकडे अजूनही हुंडा द्यावाच लागतो. त्यामुळे चांगलं कमी हुंड्याचं स्थळ आलं की जमवून घ्यावं लागतं. हुंड्याच्या प्रथेचा बचाव म्हणून आपण हे असंच चालू ठेवले तर या सामाजिक प्रथा बंद कोण करणार ? शेवटी समाज म्हणजे आपणच ना ? कायद्याने मुलीचे लग्नाचे वय किमान १८ असावे असे सांगितले आहे. वेगवेगळ्या जातीजमातीतील लवकर वयाच्या या प्रथा बदलवायच्या की हे असंच चालणार म्हणून स्वीकारायच्या हा निर्णय आपल्यालाच करायचा आहे.

विजयाताईंच्या या बोलण्यावर गटातील बायकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. मिटिंग संपली तेव्हा प्रत्येकीने निर्णयच केला होता की माझ्या मुलीचे लग्न मी योग्य वयातच करीन ! तसेच मला पटलेल्या गोष्टी मी घरातील सर्वांना समजावून सांगेन !

## क..क..कायद्याचा

### रेशनकार्डावरील आपल्या हक्काचा शिधा

कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीनुसार शासनाने रेशनकार्डाचे तीन प्रकार केले आहेत. प्रत्येक प्रकारास विशिष्ट रंग दिला आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना पिवळे रेशनकार्ड दिले जाते. दारिद्र्यरेषेखाली नसणाऱ्या परंतु कौटुंबिक आर्थिक उत्पन्न एक लाखाच्या आत असणाऱ्या कुटुंबांना केशरी कार्ड दिले जाते. तर कौटुंबिक आर्थिक उत्पन्न एक लाखाच्या वर असल्यास पांढरे रेशन कार्ड दिले जाते. वरील प्रकारानुसार कुटुंबाला मिळणाऱ्या शिध्याचे प्रमाण ठरते. महाराष्ट्रामध्ये रेशनकार्डाच्या प्रकारानुसार मिळणाऱ्या शिध्याचे प्रमाण खालील तक्त्यात दाखविले आहे.

| रेशनकार्डाचा प्रकार | वर्ग | शिध्याचा मासिक वाटा | | |
|---|---|---|---|---|
| | | जिन्नस | प्रमाण | विक्रीची किंमत |
| पिवळे रेशनकार्ड | अंत्योदय कुटुंब<br>दारिद्र्यरेषेखालील अतिशय गरीब कुटुंब | गहू | ३५ किलो प्रती कुटुंब | २ रु/किलो |
| | | तांदूळ | ३५ किलो प्रती कुटुंब | ३ रु/किलो |
| | | साखर | ५०० ग्रॅम प्रती माणशी | १३.५० रु/किलो |
| | दारिद्र्यरेषेखालील कुटुंब<br>कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १५, ००० अथवा त्याहून कमी | गहू | ३५ किलो प्रती कुटुंब | ५ रु/किलो |
| | | तांदूळ | ३५ किलो प्रती कुटुंब | ६ रु/किलो |
| | | साखर | ५०० ग्रॅम प्रती माणशी | १३.५० रु/किलो |
| केशरी कार्ड | १) कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १५, ००१ ते १, ००, ०००<br>२) कुटुंबाची सिंचनाखालील जमीन ४ हेक्टरहून कमी<br>३) कुटुंबांकडे चारचाकी गाडी नाही. अपवाद टॅक्सी. | गहू | ३५ किलो प्रती कुटुंब | ७ रु/किलो |
| | | तांदूळ | ३५ किलो प्रती कुटुंब | ९ रु/किलो |
| पांढरे कार्ड | १) कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १, ००, ००० हून अधीक<br>२) कुटुंबाची सिंचनाखालील जमीन ४ हेक्टरहून जास्त<br>३) कुटुंबांकडे चारचाकी गाडी | *या वर्गातील कुटुंबांना स्वस्त शिधा योजनेतून वगळण्यात आले आहे.* | | |

संदर्भः महाराष्ट्र शासनाची अधिकृत वेबसाईट
http://www.maharashtra.gov.in/english/food/schemes2Show.php#rat

## योजना

लेखनः विजया भोसगे,
स्नेहदीप

### कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबांना प्रोत्साहन देणेबाबत योजना.

उद्देशः स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंध होण्यास मदत होण्याच्या दृष्टीने नागरवस्ती विकास योजना (यू.सी.डी.) ही योजना राबवीत आहे.

| वैशिष्ट्ये | कोणासाठी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | कागदपत्रे | अर्ज मिळण्याचे व भरण्याचे ठिकाण | संपर्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| या योजनेअंतर्गत कुटुंब नियोजन करुन घेणाऱ्या जोडप्यांना एक मुलगी असल्यास त्या मुलीस रु. १०, ००० आणि दोन मुली असल्यास प्रत्येक मुलीस रु. ५, ००० याप्रमाणे एकूण रु. १०, ००० ची १८ वर्षाची मुदत ठेव देण्यात येते.<br><br>ही ठेव भारतीय युनिट ट्रस्ट यांच्याकडे असलेल्या चिल्ड्रन ग्रूप प्लॅन फंडमध्ये गुंतवण्यात येते.<br><br>ही रक्कम १८ वर्षांनंतर लाभार्थींना देण्यात येते. | → अल्पउत्पन्नधारक.<br>→ सदर जोडप्यापैकी कोणीही यापूर्वी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केलेली नसावी.<br>→ लाभार्थींना फक्त एक अथवा दोन मुली असाव्यात. परंतु मुलगा नसावा.<br>→ पहिल्या मुलीच्या जन्माच्या वेळी आईचे वय कमीतकमी १९ वर्षे पूर्ण असावे.<br>→ ऑपरेशन केल्यापासून एक वर्षाच्या आत अर्ज केलेला असावा. | १९ ते ३५ | नाही. | रु. १, ००, ००० च्या आत. | → रेशनकार्ड (साक्षांकित प्रती)<br>→ शस्त्रक्रिया केल्या संबंधीचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे पत्र.<br>→ महानगरपालिका/ग्रामपंचायत/नगरपालिकेने दिलेल्या जन्मदाखल्याची प्रत.<br>→ शेजार समूह गटाचा उत्पन्नाचा दाखला<br>→ मुलीचे लग्न १८ वर्षाचे आत करणार नाही याचे रु. २० च्या स्टॅंपवर प्रतिज्ञापत्र. | → वस्तीपातळीवरील गटप्रमुख<br>→ गटस्वयंसेविका<br>→ समूह संघटिका<br>→ एस्. एम्. जोशी हॉल. | एस्. एम्. जोशी सभागृह. दारूवाला पूल, पुणे. फोन :२६३३६२४९ |

## आपला अभिप्राय या कात्रणातून आमच्यापर्यंत पोहोचवा

अभिप्राय - एप्रिलः २००८

संस्थाः

शाखा क्रमांकः

या महिन्यातील सर्वात जास्त आवडलेला लेखः

आपल्या रोजच्या जीवनात मनोगत मध्ये सांगितलेली कोणती गोष्ट आपण अंमलात आणाल?

तुम्हाला एखाद्या विषयाची माहिती हवी असल्यास तो विषय नमूद कराः

आपले नावः

वयः

घरातील सदस्यांची संख्याः

या प्रश्नांव्यतिरिक्त तुमच्या सूचना, तुमच्या समस्या, तुम्ही लिहिलेले लेख, कविता या पत्त्यावर जरुर पाठवाः


- संपर्क :१४ लॅंडमार्क अपार्टमेंट, बी. जे. रोड, साधू वास्वानी चौक. पुणे४११००१.
- फोन : ०९१ (२०) २६०५ १०१३
- ईमेल : upliftindiaatul@gmail.com


## पेराल ते उगवेल



### सौ. शोभा विठ्ठल खबाडे
### दत्तवाडी

मुलीचं नुकतंच लग्न झालेलं, अजून एका मुलीचं लग्न करायचं, मुलाचा शिक्षणाचा खर्च आणि त्यातून घरखर्च. पतीचे ठराविक उत्पन्न जरी येत असले तरी त्यात घर चालवायचं म्हणजे कसरतच होत होती. त्यामुळे २००० साली सौ. शोभा खबाडे यांनी स्वत: व्यवसाय करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

बहिणीकडून त्यांना अन्नपूर्णा परिवार संस्थेच्या लघुकर्जपुरवठा च्या उपक्रमाची माहिती मिळाली. संस्थेनेही त्यांना १००० रुपयाचे कर्ज ताबडतोब मंजूर केले. पहिल्या कर्जातून त्यांनी दत्तवाडीच्या त्यांच्या घरासमोरच खाद्यपदार्थांची विक्री सुरु केली. एक टेलिफोनही ठेवला. हळूहळू आसपासच्या लोकांचा प्रतिसाद वाढू लागला. घरच्यांचेही प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे शोभाताईंनी अधिक कर्ज घेऊन दुकानात झेरॉक्स मशीन, फ्रीज घेतला. एस्.टी.डी. सुरु केला. दुकानात दुधाचे पदार्थ, आईसक्रीम असे पदार्थही ठेवले. सात वर्ष चिकाटीने व्यवसाय केल्यावर एका छोट्या टपरीला जनरल स्टोअर्सचे रूप आले. अन्नपूर्णा परिवाराकडून वेळच्या वेळी कर्ज मिळत गेले.

झेरॉक्स आणि टेलिफोन मध्ये ४० टक्के तर खाद्यपदार्थामध्ये १५ टक्क्यांपर्यंत नफा मिळू शकतो. पण त्याला घरच्यांचा पाठिंबा, लोकांचा प्रतिसाद, अन्नपूर्णासारख्या संस्थांची योग्य वेळी मदत आणि चिकाटी या सगळ्या गोष्टी जुळून याव्या लागतात असे त्या आवर्जून सांगतात.

आज माझ्या दुसऱ्या मुलीचेही लग्न झाले आहे, मुलाचे डॉक्टरकीचे शिक्षण झाले असे त्या अभिमानाने सांगतात. त्याबरोबरच आता जाबाबदाऱ्या संपल्यामुळे संपूर्ण लक्ष व्यवसाय वाढवण्याकडे देणार असल्याची जिद्द त्या बोलून दाखवतात.

मनोगत तर्फे आपल्या व्यवसायास शुभेच्छा!

लेखनः क्रिस्टिन,
स्वाभिमान